## आदेश निशाणी क्र. ०७ खाली

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हिंदु दत्तक व निर्वाह कायदा,१९५६ (यानंतर, '**हिंदु दत्तक कायदा**') च्या कलम १९ व २० प्रमाणे गैरअर्जदार क्र. १ व २ सासु–सासरे यांचेकडुन एकत्रात प्रतिमाह १०,०००/– रुपये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. **अर्जदारांचे कथनः**– अर्जदार क्र. १ हिचा पती नामे विश्वास साहेबराव गाडेकर हा दिनांक १७.०१.२०१३ रोजी मयत झालेला आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांना अर्जदार क्र. १ चे मयत पती व गैरअर्जदार क्र. ३ संतोष ही दोन मुले, गैरअर्जदार क्र. ५ अनिता, गैरअर्जदार क्र. ६ सविता व गैरअर्जदार क्र. ७ रेणूका अशी आपत्य आहेत. गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांचे लग्नकार्य व शिक्षण गैरअर्जदार क्र. १ ते ३ व अर्जदाराचे मयत पती नामे विश्वास यांनी केलेले आहे. गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांना प्रत्येकी १ लाख रूपये दिलेले असुन त्यांनी दाव्यातील मिळकतीतील आपले हक्क साक्षदारासमक्ष तोंडी सोडून दिलेले आहेत. गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांनी त्यांचा हक्क सोडून दिला असल्याने संपुर्ण मिळकतीमध्ये अर्जदारांचा १/२ हिस्सा आहे. अर्जदार क्र. १ हिच्या पती नामे विश्वासचे निधनाचे वेळी अर्जदार क्र. २ ही फक्त एक वर्षाची होती. अर्जदार क्र. १ चे पती नामे विश्वास याचे निधनानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ सुनिता व तिची मुलगी अर्जदार क्र. २ श्रध्दा यांना मारहाण करून अंगावरील कपडयानिशी घराबाहेर काढून दिले व तेव्हापासून अर्जदार ही तिच्या मुलीसह माहेरी वडीलांचे आश्रयास आली व हालअपेष्टाचे जिवन जगत आहे. तसेच गैरअर्जदारांनी त्यांची औषधपाणी, कपडालत्ता, भरण पोषण व ईतर कोणतीही

चौकशी केलेली नसून त्यांना भेटण्यास देखील आलेले नाहीत.

०३. अर्जदार व तिचे आई–वडिलाांनी बरेच वेळा गैरअर्जदारांना समजावून अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांचे हिश्याची जमीन वाटणीकरून द्या अशी विनंती केली परंतू त्यांनी जुमानले नाही व अर्जदारांना जमीन वाटून देण्यास व त्यांचा सांभाळ करण्यास नकार दिला. मौजे पिंपळगाव शेरमुलकी येथील जमीन गट क्र. १६९ क्षेत्रफळ ४० आर तसेच गट क्र. १६७ क्षेत्रफळ ३ हेक्टर ही जमीन गैरअर्जदार क्र. २ चे नावावर एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातुन मेहनत मशागत करून घेतलेली आहे. सदरील मिळकती हिंदु एकत्र कुटूंबाच्या संयुक्त मालमत्ता असुन एकत्रीतपणे उपभोग घेत आहे व ते संयुक्त कब्जेदार आहेत. गट क्र. १६९ क्षेत्रफळ ४० आर व गट क्र. १६७ क्षेत्रफळ ३ हेक्टर ही अविभक्त मिळकत असून अर्जदार क्र. १ व २ हे गैरअर्जदारांचे हिंदु एकत्र कुटूंबाचे सहदायी आहेत व त्यांच्यात अद्याप कोणत्याही प्रकारच्या वाटण्या झलेल्या नहीत. अर्जदार, तीचे भाउ व मामा यांनी दिनांक १३ जुन २०१८ रोजी मौजे पिंपळगाव शेरमुलकी येथे जावून वाद जमीनीमध्ये वाटणी करून ताबा देण्याविषयी विंनती केली परंतु सर्व गैरअर्जदारांनी अर्जदारास मारहान केली व शेताबाहेर काढून तुला एक गुंठा जमीनसुध्दा मिळणार नाही व वादजमीनीं हस्तांतरीत करण्याची धमकी दिली. गैरअर्जदार आशाबाईने तीचे नावावरील जमीन असल्याचा गैरफायदा घेवून वाद जमीनी हस्तांतर केल्या तर अर्जदारांचे कधीही न भरून येणारे नुकसान होवून अर्जदारांवर उपासमार येईल व कधीही न भरून येणारे नुकसान होईल. अर्जदार क्र. १ व २ हे मयत विश्वास गाडेकर यांच्या निधनाने खचून गेलेले आहेत, त्यांच्याकडे उत्पनाचे साधन नाही, त्यांचेवर उपासमार आली आहे व माहेरी आई–वडिलांकडे

हालअपेष्टेत जिवन जगत आहे. अर्जदाराचे पतीच्या निधनानंतर गैरअर्जदारांनी त्यांना कोणताही खर्च पुरविलेला नाही व अर्जदार क्र. २ ही शिक्षण घेत असून तीला बराच खर्च लागतो. गैरअर्जदार क्र. १ व २ हे अर्जदार क्र. १ हिचे सासू–सासरे असुन गैरअर्जदार क्र. २ चे नावावर गट क्र. १६७ व १६९ मध्ये जमीनी असून त्यामध्ये ते भरघोस उत्पन्न घेत आहेत. त्यामुळे, अर्जदारांनी वरीलप्रमाणे पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

०४. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र. १६ वर दाखल केले व अर्जदारांचे व गैरअर्जदाराचे नातेसंबंध व गैरअर्जदार क्र. ५ ते ७ यांचे लग्न गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी केल्याचे मान्य केले व व्यतिरीक्त ईतर कथन स्पष्टपणे नाकारले. गैरअर्जदारांचे पुढे म्हणणे असे की, अर्जदार क्र. १ चे पती मयत झल्याच्या १३ दिवसानंतर ती व गैरअर्जदार क्र. २ हिला घेवून माहेरी गेली व गैरअर्जदारांनी तिला परत येण्यासाठी विनंती केली असता तिने बळजबरी करू नका नाहीतर मी स्वतःचे बरेवाईट करील अशी धमकी दिली. वाद मिळकत ही अर्जदार किंवा गैरअर्जदार क्र. १, ३ ते ७ यांची वडीलोपार्जीत मिळकत नाही व एकत्र कुटूंबात अर्जदार किंवा गैरअर्जदार क्र. १, ३ ते ७ यांनी मेहनत मशागत करून खरेदी केलेली नसून गैरअर्जदार क्र. २ हिला तिचे आई–वडीलांनी स्त्रीधन म्हणुन खरेदीखत क्र. १५५७/१९८२ व १४९८/१९८८ आधारे खरेदी करून दिलेले असल्याने वाद मिळकतीवर तिचा स्वतंत्र मालकीच्या अबाधीत कायम मिळकती आहेत. अर्ज दाखल करते वेळी गैरअर्जदार क्र. १ व २ यांचे चुकीचे वय दर्शविण्यात आले होते आता त्यांचे वय ६८ ते ६९ असून दोघेही वयवृध्द असल्याने कसेबसे काम करून ते आपला उदरनिर्वाह करीत आहेत. त्यामूळे ते

अर्जदारांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही पोटगी देण्यास असमर्थ आहेत. अर्जदाराचे वडिलांकडे बरीच जमीन असून सुधारीत हिंन्दू वारसा गायद्याप्रमाणे अर्जदार क्र. १ हिचा वडीलांचे जमीनीत हिस्सा असून सदर जमीनीचे उत्पन्नातून व शिलाई मशीनच्या कामातून ती स्वतःचा व अर्जदार क्र. २ हिचा चांगल्याप्रकारे उरदनिर्वाह करू शकते. त्यामुळे, त्यांनी सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०५. अर्जदारांतर्फे श्री. एस.एम. साबळे व गैरअर्जदारांतर्फे श्री. डी. एस. ठाले विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच, अभिलेखाची पाहणी केली असता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उद् भवत असून त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतात का की, ते गैरअर्जदारांकडून वर मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. ? | **<u>नाही</u>** |
| २. | काय आदेश ? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

०६. अर्जदार व गैरअर्जदारांनी वरील कथनांच्या समर्थनार्थ काही दस्तऐवज दाखल केले आहेत. सदर दस्तऐवजांचे वाचन आवश्यकतेनुसार खालील प्रमाणे करण्यात येईल.

## <u>का र ण मि मां सा</u>

०७. **<u>मुद्दा क्र. १ करीताः</u>**– अर्जदारांतर्फे ॲड. साबळे यांनी युक्तीवाद केला की, अर्जदाराचे पतीचे निधनानंतर गैरअर्जदारांनी तिला व अर्जदार क्र. २

यांना अंगावरील कपडयानिशी घराबाहेर काढून दिले. तसेच, तेव्हापासून ते आजपर्यंत गैरअर्जदारांनी त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही व आजरोजी अर्जदारांवर उपासमारीची पाळी आली आहे. याउलट, गैरअर्जदारांतर्फे ॲड. ठाले यांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदारांनी अर्जदार हिला सासरी येण्याची विनंती केली असता तिने येण्यास नकार दिला. तसेच, वाद मिळकत ही अर्जदार किंवा गैरअर्जदार क्र. १, ३ ते ७ यांची वडीलोपार्जीत मिळकत नाही व एकत्र कुटूंबात अर्जदार किंवा गैरअर्जदार क्र. १, ३ ते ७ यांनी मेहनत मशागत करून खरेदी केलेली नसून गैरअर्जदार क्र. २ हिला तिचे आई–वडीलांनी स्त्रीधन म्हणुन खरेदीखत क्र. १५५७/१९८२ व १४९८/१९८८ आधारे खरेदी करून दिलेले असल्याने वाद मिळकतीवर तिचा स्वतंत्र मालकीच्या अबाधीत कायम मिळकती आहेत. अर्ज दाखल करते वेळी गैरअर्जदार क्र. १ व २ यांचे चुकीचे वय दर्शविण्यात आले होते आता त्यांचे वय ६८ ते ६९ असून दोघेही वयवृध्द असल्याने कसेबसे काम करून ते आपला उदरनिर्वाह करीत आहेत. त्यामूळे ते अर्जदारांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही पोटगी देवू शकत नाही, असा युक्तीवाद त्यांनी केला.

०८. सर्वप्रथम मी येथे हे नमूद करु ईच्छीते की, अर्जदार हे वर नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ व २ सासू–सासरे यांचेकडून हिंदु दत्तक कायद्याच्या कलम १९ व २० प्रमाणे पोटगी मागत आहेत. सदर मागणीस गैरअर्जदार क्र. १ ते ७ यांनी विरोध केला. त्यामुळे, येथे सर्वप्रथम हे पाहणे गरजेचे आहे की, कलम १९ व २० प्रमाणे अर्जदार ही तिचे सासू–सासरे यांच्याकडून पोटगी मागु शकते का ? कलम १९ व २० चे काळजीपुर्वक वाचन केले असता

असे दिसते की, कलम २० अन्वये हिंदु पत्नीचा सांभाळ करण्याची जवाबदारी तिच्या जिवंतपणी फक्त् तिच्या पतीवर टाकलेली आहे व तिच्या पतीच्या निधनानंतर कलम १९ अन्वये तिच्या सास–यावर टाकलेली आहे. माझ्यामते कलम २० प्रमाणे पती हा जिवंत असल्यास त्याच्या कडून पोटगी मागता येते, परंतू सदर प्रकरणात अर्जदार हिचा पती मयत झालेला आहे. करीता, तिला कलम २० अन्वये पोटगी मागता येत नाही. तसेच कलम १९ अंतर्गत केवळ अर्जदाराच्या सास–याच्या नावे वडीलोपार्जीत मिळकत असल्यास तिला सास–याकडून पोटगी मागता येते, परंतू सदर प्रकरणात अर्जदार हिने दाखल केलेल्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, ७/१२ उता–यामध्ये केवळ गैरअर्जदार क्र. २ सासू हिच्या नावे जमीन असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, निश्चितच अर्जदार हे गैरअर्जदारांकडून वरील तरतुदी अन्वये पोटगी मागू शकत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर वरीलप्रमाणे दिले आहे.

०९. **मुद्दा क्र.२ करीताः**– मुद्दा क्र.१ च्या वरील निष्कर्षावरुन अर्जदारांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मुद्दा क्र. २ चे उत्तर मी खालील आदेशान्वये नोंदवित आहे.

## आ दे श

निशाणी क्र. ७ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरित/—

भोकरदन (एस. एस. बजाज)
दिनांकः १५.१०.२०२०. दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर)
भोकरदन.

Shital Shriram Bajaj
Digitally signed by Shital Shriram Bajaj
Date: 2020.10.16 13:44:21 +0530

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : यु. आर. दसरे

न्यायालयाचे नांव : सह. दिवाणी न्यायालय, भोकरदन.

दिनांक : १५.१०.२०२० स्वाक्षरित/—

लघुलेखक गेड—३.